सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## संशोधन सुविधा केंद्र व ठिकाण नियमावली

१. संस्था/महाविद्यालयामध्ये संबधित विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम अथवा पदवी वर्ग सुरु असणे आवश्यक आहे.

२. संशोधन सुविधा केंद्रास मान्यता मिळण्यासाठी संस्था/महाविद्यालयातून संबंधित विषयातील दोन पदव्युत्तर बॅचेस किंवा अनुदानित महाविद्यालयातील संबंधित विषयातील पदवी च्या पाच बॅचेस बाहेर पडणे आवश्यक आहे.

३. संस्था/महाविद्यालयामध्ये संबधित विषयाचे मान्यताप्राप्त मार्गदर्शक उपलब्ध असणे आवश्यक आहे.

४. संबंधित विषयासाठी स्वतंत्र विभाग/प्रयोगशाळा संगणक, फर्निचर, इंन्टरनेटची सुविधा असणे आवश्यक आहे.

५. संबंधित विषयाची सुसज्य आणि समृध्द आवश्यक संशोधन साधनाची प्रयोगशाळा असावी.

६. संबंधित विषयाची ग्रंथालयात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालीके पुरेशा प्रमाणात व पुरेसे संदर्भ ग्रंथ असावेत.

७. INFLIBNET ची सोय असावी. (सर्व विषयासाठी व Library & Information Science साठी)

८. सुसज्य जिमखाना असावा. (Physical Education साठी)

९. संशोधन सुविधा केंद्राची मान्यता पाच वर्षासाठी देण्यात यावी.

१०. पीएच.डी. कोर्सवर्क साठी अध्यापन व मार्गदर्शक करण्याची जबाबदारी संबंधित पीएच.डी. संशोधन सुविधा केंद्राची राहील.

११. पीएच.डी. संशोधन सुविधा केंद्रातील संशोधक विद्यार्थी व मार्गदर्शक यांना चर्चासत्रे/परिषदा/कार्यशाळा यासाठी पाठवावे व त्यासाठी आर्थिक तरतूद करावी.

१२. विद्यार्थ्यांचे सहामाही प्रगती अहवाल व परीक्षा अर्ज व इतर गोष्टी संशोधक मार्गदर्शक व संशोधन सुविधा केंद्रामार्फत पाठविण्यात यावे.

१३. संशोधन सुविधा ठिकाण हे संशोधन सुविधा केंद्रामध्ये वर्ग करण्यात आले आहे. त्यामुळे संशोधन सुविधा ठिकाणाच्या शुल्काची आकारणी संशोधन केंद्रानुसार करण्यात यावी व विद्यापीठाचे शुल्क विद्यापीठाकडे सादर करावे. संबंधित शुल्क संशोधन केंद्राच्या विकासासाठी वापरण्यात यावे.

१४. अभियांत्रिकी महाविद्यालयातून विज्ञान पदवी शाखेचे पदवीधर उत्तीर्ण होत नसल्याने अट क्र. १ अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी केवळ पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, गणित, इंग्रजी व भूशास्त्र या पाच विषयांपुरती शिथील समजण्यात यावी.

१५. संशोधन सुविधा केंद्रास मान्यता मिळण्यासाठी संस्था / महाविद्यालयातून संबंधित विषयातील पदवीच्या पाच बॅचेस बाहेर पडणे आवश्यक असल्याने अट क्र. २ अभियांत्रिकी महाविद्यालयातील विज्ञान विषयासाठी शिथील समजण्यात यावी, तथापि, संबंधित अभियांत्रिकी महाविद्यालयातील विज्ञान शाखेतंर्गत पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, गणित, भूशास्त्र व कला शाखेतंर्गत इंग्रजी या विषयाशी संबंधित संशोधन प्रयोगशाळेसंदर्भात महाविद्यालयातून पदवी अभ्यासक्रमाच्या (Bachelor of Engineering) पाच ऐवजी दोन बॅचेस बाहेर पडणे आवश्यक आहे.

| Sr.No | Items | Fee details |
|---|---|---|
| 1 | Admission fee | College |
| 2 | Registration fee | University |
| 3 | Laboratory fee (Science) | College |
| 4 | Laboratory deposit (Science) | College |
| 5 | Library fee (Yearly) | College |
| 6 | Internet Fee (Yearly) | College |
| 7 | Library Deposit (One Time) | College |
| 8 | Tuition fee (Yearly) | College |
| 9 | Lab Development fee (Yearly) | College |
| 10 | Gymkhana fee (Yearly) | College |
| 11 | Medical Charges (Yearly) | College |
| 12 | Students Aid Fund (Yearly) | University |
| 13 | Yuvak Mahostav (Yearly) | University |
| 14 | Apatkalin Nidhi(Yearly) | University |
| 15 | Ashwamedha Fee (Yearly) | University |
| 16 | University Devlp. Fund (Yearly) | University |
| 17 | Pro-Rata | University |